# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६
☎(020)25656234, FAX : (020)25656234
ईमेल : ropune.dte@gmail.com संकेतस्थळ : ww.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/संवि/2016/ 4514 दिनांक 07 NOV 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग

विषय :- राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति (EBC) योजने बाबत.....
संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक टीईएम -2015/प्र.क्र. 219/तांवि-4 दिनांक ३१ मार्च, २०१६
२. शासन निर्णय क्रमांक टीईएम-2016/प्र.क्र.501/ तांशि-4 दिनांक १३/१०/२०१६

महाराष्ट्र शासनाने राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजना (EBC) राबविणे संदर्भात उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय निर्गमित केले आहेत. या अनुषंगाने सद्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील पोर्टलवर या योजनेकरीता विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरत आहेत.

सदर योजनेकरीताचा अर्ज भरताना येणा-या तात्रिक अडचणींबाबत मार्गदर्शनाकरीता संस्थांकडुन विद्यार्थी / पालकांना या कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क साधण्याबाबत सुचित केले जात आहे.

**या अनुषंगाने सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजनेकरीता (EBC) अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी ही संपुर्णपणे संस्थेचीच असुन कोणत्याही विद्यार्थी / पालकास या कार्यालयाकडे मार्गदर्शनाकरीता पाठवु नये.** सदर योजनेकरीता अर्ज करताना येणा-या तांत्रिक अडचणींबाबत सर्व विद्यार्थ्यांचा एकत्रित प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयाकडे संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत सादर करावा. तसेच या बाबत आपल्या संस्थेतील शिष्यवृत्तीचे काम पाहणा-या कर्मचा-यास आपल्या स्तरावर योग्य त्या सुचना निर्गमित कराव्यात.

कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी / पालकांस या कार्यालयाकडे पाठविले जाणार नाही त्याचप्रमाणे कोणताही पात्र लाभार्थी अर्ज करण्यापासुन वंचित राहणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी. याबाबतच्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

( डॉ. दि. रा.नंदनवार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे